पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834.
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

**प्रेसनोट** **दिनांक 04.05.2022**

## लाउडस्पिकर चा वापर करतांना सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशांचे पालन करा - पोलीस अधीक्षक, वाशिम

लाउडस्पिकर चा वापर करणे बाबत सर्वोच्च न्यायालयाने दिशा निर्देश दिलेले आहेत. नागरीकांनी लाउडस्पिकर चा वापर करतांना सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि ध्वनिप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम 2000 मधील तरतुर्दीचे तंतोतंत पालन करावे असे वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

यापुढे वाशिम जिल्हयात ज्या ठिकाणी **(संस्था / धार्मिक स्थळे / प्रासंगिक सांस्कृतीक, धार्मिक कार्यक्रम इत्यादी)** लाउडस्पिकरचा वापर होतो तेथे लाउडस्पिकर लावणे करीता वाशिम पोलीस दलाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि ध्वनिप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम 2000 मधील तरतुर्दीच्या अधिन राहुन अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्यांना लाउडस्पिकर लावण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

**त्या करीता वाशिम जिल्हा पोलीस तर्फे परवानगी करीता अर्ज करण्यासाठी आदर्श कार्यप्रणाली तयार केली आहे.**

01. ध्वनिप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम 2000 अन्वये शांतता क्षेत्राच्या 100 मिटर परीसरात ध्वनीक्षेपक/लाउडस्पीकर लावण्यास, वापरण्यास व इतर कोणत्याही प्रकारचे वादय वाजविण्यास मनाई आहे.

02. **ध्वनिप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम 2000 नुसार खालील प्रमाणे ध्वनीपातळीच्या मर्यादेचे पालन करणे बंधनकारक असेल.**

| क्षेत्राचा वर्ग | क्षेत्राची झोनची वर्गवारी | डेसीबल (ए) एल इ क्यु मधील मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| (अ) | औदयोगिक क्षेत्र | 75 डी.बी. (अे) एलईक्यु | 70 डी.बी. (अे) एलईक्यु |
| (ब) | व्यापारी क्षेत्र | 65 डी.बी. (अे) एलईक्यु | 55 डी.बी. (अे) एलईक्यु |
| (क) | निवासी क्षेत्र | 55 डी.बी. (अे) एलईक्यु | 45 डी.बी. (अे) एलईक्यु |
| (ड) | शांतता क्षेत्र | 50 डी.बी. (अे) एलईक्यु | 40 डी.बी. (अे) एलईक्यु |

03. **मर्यादेत ध्वनिप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम 2000 अन्वये दिवसा 06.00 ते रात्री 22.00 वा. च्या राहील.**

04. कोणत्याही जाती, धर्माच्या लोकांच्या भावना दुखवतील अगर एखादयाची बदनामी होईल, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवेल अशी कोणतीही घोषणा, भाष्य/मजकुर याचे या लाउडस्पिकर वरुन प्रसारण करता येणार नाही.

05. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यकता पडल्यास कोणतीही पुर्व सुचना न देताही दिलेली परवानगी रदद करण्यात येईल.

06. ज्या धार्मिक स्थळावर विनापरवानगी लाउडस्पिकर लावण्यात आले आहेत त्यांनी तात्काळ परवानगी घेणे बंधनकारक राहील.

07. या बाबत मा. पोलीस अधिक्षक वाशिम यांनी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. परवानगी बाबत नमुना अर्ज सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना पाठविण्यात आला आहे.

08. पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे परवानगी देणेकरीता सक्षम अधिकारी राहतील. लाउडस्पिकरची परवानगी मिळणे करीता संबंधित पोलीस स्टेशनला अर्ज करु शकतात.

वाशिम जिल्हा पोलीस तर्फे लाउडस्पिकरच्या परवानगी करीता तयार केलेल्या आदर्श कार्यप्रणाली मध्ये नमुद असलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्यांची परवानगी रदद करण्यात येउन त्यांचे विरुदध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा,वाशिम.